# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

## प्रेसनोट

## पीएमपीएमएलच्या पुण्यदशम बसेस फिटनेस सर्टिफिकेटमुळे तात्पुरत्या स्वरूपात संचलनात नसलेबाबत

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या स्वारगेट डेपोमधून ५० पुण्यदशम बसेस संचलनात आहेत. दि. ०८/०७/२०२३ पासून सदर बसेसचे फिटनेस संपल्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात आर.टी.ओ. फिटनेसकामी संचलनात नव्हत्या. तथापि शनिवार, दि. १५/०७/२०२३ रोजी ९ बसेसचे फिटनेस सर्टिफिकेट प्राप्त झाल्यामुळे सदर ९ बसेस संचलनात आहेत. बुधवार, दि. १९/०७/२०२३ रोजी ११ बसेसचे फिटनेस सर्टिफिकेट प्राप्त झाल्यानंतर या ११ बसेस संचलनात येणार आहेत. उर्वरीत बसेस टप्प्याटप्प्याने दि. २२/०७/२०२३ पासून फिटनेस सर्टिफिकेट प्राप्त झाल्यानंतर संचलनात येणार आहेत. पुण्यदशम बसेस फिटनेस अभावी संचलनात येणार नसल्याने प्रवाशांची गैरसोय होऊ नये याकरीता त्याच्या जागी साध्या बसेसची व्यवस्था करणेत आलेली आहे.

पुण्यदशम बसेसचे आर.टी.ओ. फिटनेसची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रथम संबंधित कंपनी (आयशर) त्यांच्या पोर्टलवरून सदर बसेसची ऑनलाईन के.वाय.सी. व ऑनलाईन व्ही.एल.टी.डी. सर्टिफिकेट प्राप्त करून देते. सदरची दोन्ही सर्टिफिकेट कंपनीकडून प्राप्त झाल्यानंतर सदर बसेस पीएमपीएमएल कडून आर.टी.ओ. फिटनेससाठी उपलब्ध करून दिल्या जातात. सदरची प्रक्रिया पीएमपीएमएल मध्ये नवीन असल्यामुळे व प्रथमतःच करणेत येत असल्याने ऑनलाईन सर्व्हरच्या अडचणीमुळे फिटनेस सर्टिफिकेट प्राप्त करून घेण्यास विलंब होत आहे. सदर कारणास जबाबदार असलेल्या आयशर बसेसची देखभाल दुरूस्ती करणाऱ्या ठेकेदारावर जबाबदारी निश्चित करणेत आलेली आहे. तरी प्रवाशांच्या काही प्रमाणात होत असलेल्या गैरसोयी बद्दल पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे.

**sd/-**
चिफ मेकॅनिकल इंजिनिअर
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

दि. १७/०७/२०२३

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

**sd/-**
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---